# BBC LEARNING ENGLISH
## How do I talk about feeling ill?

*This is not a word-for-word transcript*

**Tejali**
बीबीसीच्या 'How do I…' मध्ये तुमचं स्वागत, मी तेजाली आणि माझ्यासोबत आहे शान.

**Sian**
Hi, everybody!

**Tejali**
कधी कधी आपण आजारी पडतो, आजारी पडणं म्हणजे **ill.** सर्दी, खोकला, ताप काहीही... अशावेळी कुठले इंग्रजीतून सांगताना योग्य शब्द कसे वापरायचे ते आजच्या भागात शिकूया.

*I've got a cold.*
*I have a sore throat and a cough.*
*I have a headache.*

**Tejali**
इथे तर सगळेच आजारी पडलेत. Sian, shall we look and some vocabulary to talk about being ill?

**Sian**
Yes, the first person said 'I've got a cold'. So if you have an illness, you can say 'I've got …' and then give the name of the illness.

**Tejali**
Yes, so a cold म्हणजे 'सर्दी' – आणि cold च्या आधी 'a' वापरायला विसरू नका.

**Sian**
Yes although if you have 'the flu', we use 'the' not 'a'. So we say 'I've got a cold' but we say 'I've got the flu'.

**Tejali**
That's right. Flu म्हणजे 'ताप'. Now shall we look at some of the symptoms of a cold or the flu? Symptoms म्हणजे लक्षणं.

**Sian**
Yes, so speaker two says 'I have a cough' – and a cough is this. Let's practise the pronunciation.
'a cough'


© British Broadcasting Corporation 2018

‘I have a cough’

**Tejali**
तिच्या घशालाही त्रास होत होता, घसा म्हणजे – 'throat'. सुजलेल्या घशासाठी कुठलं विशेषण वापरलं? Let's listen again to find out.

*I have a sore throat.*

**Sian**
Yes, we use the adjective 'sore' when we feel pain. So you can have a sore arm or a sore leg for example.

You can also use the verb 'hurt' – you can use 'hurt' with any body part where you feel pain. For example, my arm hurts, my head hurts, my legs hurt.

**Tejali**
तिचा घसा दुखत होता म्हणून त्याने 'hurt' क्रियापद वापरलं. घसा एकवचनी आहे त्यामुळे इथे hurtचा एकवचनी तिसरं रूप hurts वापरायला हवं. एकाने म्हटलं डोकं दुखतंय, डोकं म्हणजे म्हणजे head. Can you remember how they said this?

*I have a headache.*

**Sian**
So with some body parts we use 'ache' to say that you have a continuous pain. So you can say 'I have a…' or 'I've got a' and then the body part and the word ache.
Let's practise the pronunciation. Repeat after me:

'ache'
'I have a headache'

**Tejali**
छान, म्हणजे दुखण्यासाठी 'ache' हा आणखी एक शब्द कळला तुम्हाला. डोकं, दात, पोट, पाठ, कान यासाठी 'ache' वापरतात.

**Sian**
So, if you have a pain in your ear you can say ' I have an earache'.
**Tejali**
आजारी असाल तर नक्की काय झालंय हे कसं सांगायचं ते समजलंय तुम्हाला, आता प्रॅक्टिस करू. पोटात दुखत असेल तर कसं सांगाल डॉक्टरांना? विचार करा आणि नंतर शानचं उत्तरही ऐका.

**Sian**
I have a stomach ache and a cough.


© British Broadcasting Corporation 2018

**Tejali**
बरोबर आलं का तुमचं? आता तुमच्या बॉसला फोन करून सांगा की तुम्हाला बरं वाटत नाही, त्यामुळे तुम्ही आज ऑफिसला येणार नाही. कसं सांगाल? विचार करा आणि नंतर शानचं उत्तरही ऐका.

**Sian**
I've got the flu.

**Tejali**
आता समजा तुमचा हात दुखतोय. कसं सांगाल इंग्रजीत? तुमचा हात सुजलाय किंवा काही लागलं आहे. विचार करा आणि नंतर शानचं उत्तरही ऐका.

**Sian**
I have a sore hand.

My hand hurts.

**Tejali**
Did you say the same? Good!

**Sian**
Well done! Hopefully you are all feeling well.

**Tejali**
Get well soon if not!

**Sian**
Bye, everyone!

**Tejali**
Bye!


© British Broadcasting Corporation 2018